वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड. श्री. पी.एम. राठी वकिलांमार्फत शपथेवर सुरू.

१. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. माझा धान्याचा व्यापार आहे. हे म्हणणे खरे आहे की, धान्याच्या व्यवसायाकरीता मी शासनाकडून रितसर परवाना घेतला आहे. तो परवाना गेल्या १५ वर्षापूर्वी मी घेतला होता. मी शेतकऱ्यांकडून सर्व धान्य घेण्याचा व ते बाजारात विकण्याचा परवाना घेतला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या परवान्यामध्ये धान्य ठेवण्याचे ठिकाण नमुद असते.

२. मी बुलढाणा अर्बन पतसंस्था व क्रांती ज्योती पतसंस्था, दोन्ही शाखा– असलगांव यांचेकडून गोदाम पावतीवर तारण ठेवून कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी संस्थेकडून देखील गोदाम पावतीवर तारण ठेवून कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.१०.२०१६ व १८.१०.२०१६ रोजी मी प्रतिवादी संस्थेकडून गोदाम पावतीवर तारण ठेवून एकूण रू.६,५०,०००/– चे कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या कर्जाच्या वेळी प्रतिवादी संस्थेने कर्जाबाबतच्या दस्तांवर माझ्या सह्या घेतल्या होत्या. साक्षिदार स्वत:हून सांगतो की, केवळ एका कागदावर माझी सही घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, कर्जाच्या वेळी मी कर्ज मागणी अर्ज, करारपत्र व वचनचिठ्ठी यावर सह्या केल्या होत्या.

(प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी तोंडी विनंती केल्यावरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत शेवटची संधी म्हणुन तहकूब करण्यात आला.)

समक्ष

दिनांक: १०.११.२०२५
ठिकाण: अकोला

(व्ही.व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.